**वाट वळणाची**
**-सुरेखा हेमंत मोंडकर**

मी लग्न करून ह्या घरात आले तेव्हांही ही बाग बहरलेलीच होती .औरस चौरस छान निगराणी असणारं एक छोटंसं उद्यानच होतं . हिरवंगार लोंन ,त्याला वळसा घालून जाणारा कमनीय ड्राईव्ह वे .लोखंडी कड्या असणारा सुबक लाकडी झोपाळा . त्याच्या आधार स्तंभावर चढलेली , बहरून आलेली लडिवाळ मधुमालती . कंपाऊंडवर पहुडलेली , तर्हेतर्हेच्या रंगांची उधळण करणारी बोगनव्हिलची फुलं . मुख्य प्रवेशद्वाराच्या कमानीवर गजबजून आलेलं कृष्णकमळ . पाउल टाकताच मन प्रसन्न व्हायचं .

ह्या बागेच्या सौंदर्यात माझी कर्तबगारी काहीच नाही ,बरं कां ! बागेच्या तब्येतीची काळजी घ्यायला तद्न्य माळीबाबा होते . तसं पाहिल्यास घरातल्या आणि घरा बाहेरच्या कोणत्याच सजावटीत , रचनेत माझा सहभाग नव्हता . मी प्रवेश केला त्याच्या आधीपासूनच हे घर छान वसलेलं होतं आणि त्याची व्यवस्था पाहायला तरबेज चाकर वर्ग पण होता .

नोकराचाकरांनी भरलेल्या ह्या घरात मी उपरी होते . मी काही हालचाल जरी केली तरी ती ढवळाढवळ होते . बागेचा एक हिस्सा मात्र मी ताब्यात घेतला होता . माळीबाबांच्या कलाकुसरीत व्यत्यय न आणता मी त्या तुकड्यावर माझा मनपसंत कारभार करायचे . नवीन रोपं आणली होती . माती उकरायची , वाफे करायचे , योग्य जागी योग्य रोपांची योजना करायची , ह्यात मी व्यग्र होते . मुख्य रस्त्यावर बराच वेळ सायकलची घंटा वाजतेय हे माझ्या लक्षात आलं होतं .पण मी आपली माझ्यातच दंग होते . इतक्यात माझ्या जवळून हाक आली ,
" ताई , तुमचा शृरग ! "

दचकलेच मी . लक्ष नव्हतं ना !गर्क होते बागकामात . दचकून पाहिलं तर एक काळीसावळी ,सडपातळ ..खरं म्हणजे कृश मुलगी माझ्या बाजूला उभी होती .तिच्या हातात माझा श्रग होता .मातीत खराब होऊ नये म्हणून मी कामाला सुरुवात करण्याच्या आधी तो झोपाळ्यावर ठेवला होता .
"ताई , तिकडे त्या जास्वंदीवर पडला होता .वाऱ्याने उडाला असणार बहुतेक ! "

एक अपरिचित मुलगी , स्वतःहून घरी चालत आली होती . ही बंगल्यांची कॉलनी .संध्याकाळी पार्क मध्ये किंवा क्लब हाउस मध्ये कुणाकुणाच्या भेटी व्हायच्या . एकमेकांच्या घरी जायची फारशी पद्धत नव्हतीच . माझ्या वयाच्या बायका तर फारच कमी होत्या . अरुण सकाळी बाहेर पडला की घरात आम्ही तिघंच , ममा , पापा आणि मी ! जो तो आपापल्या खोलीत , आपापल्या विश्वात !

त्या मुलीला बघूनच मी हरखून गेले . तिच्या जवळ जाता जाता मी म्हटलं ,
" ए , थ्यांक्स ग ! बरं झालं तुला सापडला , नाहीतर गेला असता बाहेर उडून ! "

तिच्या समोर माझे मातीने भरलेले हात नाचवत तिला सांगितलं ,
" ठेव ना प्लीज त्या झोपाळयावर ; आणि माझा मोबाईल ठेव त्यावर वजन म्हणून. पुन्हा नको उडून जायला ना ! "

श्रग ठेवून ती जायला वळली . कधी नव्हे तो अंगणात आलेला नवा चेहरा ! मी बोलायला आसुसले होते . घाईघाईने म्हटलं ,
"थांब ना ! चहा पिऊया . थांब आलेच मी हात धुऊन ! "

"ताई , कामावर जायचंय . उशीर होईल ! "

."पांच दहा मिनिटांनी काही उशीर होत नाही ! बैस ! चहा तयारच असेल ."

मी अगदी उतावीळ झाले होते, तिच्याशी बोलायला . माझी मलाच दया आली . वर्षभरापूर्वी , लग्नाच्या आधी असल्या किरकोळ सामान्य मुलीशी मी औपचारिक आभाराचे दोन शब्द बोलले असते . जिवणी जरा फाकवली असती आणि ती जायची वाट पाहिली असती .
"ताई , येईन ना पुन्हा ! लेट मार्क झाला तर पगार कापतात ताई ! मी रोज तुमच्याच दारावरून जाते ; येईन की पुन्हा ! "

" नक्की? नक्की येशील ना?" तिच्या बरोबर गेट कडे जाता जाता मी हालवून खुंटा बळकट करीत होते .

" कधीतरी नको ; आजच ये .. संध्याकाळी . नक्की ये हं ! मोगरा फुललाय .मी तुझ्यासाठी गजरा करून ठेवते .नाही आलीस तर फुकट जाईल . मला काही उपयोग नाही त्याचा ." मी माझे कापलेले लांडे केस तिच्यासमोर फलकारत म्हटलं .

"एक नवीन ओळख होत होती . माझा जीव फुलारून आला होता . बोलल्याप्रमाणे ती संध्याकाळी आली . मी गजरा मुद्दामच अर्धा गुंफला होता . तिने जास्त वेळ थांबावं म्हणून . झोपाळ्यावर गप्पा मारता मारता गजरा पूर्ण झाला . चहा पिता पिता पुन्हा गप्पा मारून झाल्या . तिचं नाव प्रियांका !

नंतर ती बऱ्याच वेळा घरी जाताना माझ्याकडे डोकावून जायची . जातायेता सायकलच्या घंटीचा सलाम तर नेहमीचाच . सकाळी ती घाईत असायची म्हणून बऱ्याच वेळा फुलं , गजरा घेऊन , तिची वाट बघत मी गेटपाशीच उभी राहायची . ती पण कधी कधी प्लास्टिकच्या डब्यातून अळूवड्या , लाडू , चकल्या, असे चविष्ट पदार्थ माझ्या हातात कोंबून पळायची .

पण आमच्या भेटीची लक्ष्मण रेषा बागेपर्यंतच होती . ती कधी घरात आली नाही ; मी ही कधी बोलावली नाही .चार भिंतीत सतत राहून माझा दम घुसमटत होता . मला बाहेरची मोकळी हवा फुफ्फुसात भरून घ्यायची होती आणि तिच्यामुळे माझा तो भिंतीबाहेरचा मोकळा वेळ फुलपाखरी बनत होता .

अरुण नेहमी उशिराच घरी यायचा. मोबाईल बघत बघत जेवण व्हायचं .नंतर बेडरूममध्ये laptop उघडून त्यात डोकं खुपसून बसायचा .

"भाजी घे ना ! "

"नको !"

"कां रे ? आवडली नाही का ? "

अंगठा आणि तर्जनी जोडून मोराच्या पिसार्यासारखी नाचवली की संपलं डायनिंग टेबलवरचं संभाषण . नंतर बेडरूम मध्ये ,

"तो laptop बंद कर ना !"

"हुं !"

"झोप नाही येत कां ?"

"कामं आहेत ग ! "

संपला संवाद .

माझ्या कपाळावरची शीर तडतडायला लागली की मिनी बार मधला बिअरचा क्यान घेऊन मी बाल्कनीत जाऊन बसायची . एकटीच ! डोक्यात कोलाहल आणि शरीराची तडफड . चिल्ड बीअरने आंघोळ केली असती तरी ती थंड झाली नसती .काम आटोपून तो झोपलेला असायचा . त्याला चाहूल लागणार नाही इतक्या अलगदपणे,त्याच्यापासून अंतर ठेवून मी बेडवर पहुडायचे . मध्येच कधीतरी तो मला खेटायचा , बिलगायचा ,'सावध असतो ! वसुली बरी कळते!" मी चरफडतच त्याच्या खेळात सामील व्हायचे .थोडाफार फरक पण बहुतेक रात्री अशाच असायच्या

आमच्या बंगल्यापासून थोड्याच अंतरावर चित्रात काढावी अशी देखणी , घनदाट टेकडी आहे बऱ्याचदा मी तिथे चालायला जाते . एकदा सायकल वरून मला ती टेकडी पालथी घालायचीय . निरनिराळ्या ऋतूतील तिचं वेगळं वेगळं रूप निरखायचंय ; अरुण बरोबर ! ऋतु आले ऋतू गेले पण अजुनही अरुणने माझी ही चिटकुली इछया पण पूर्ण नाही केलेली . एका रविवारी म्हणाला ,
"चल, एक मोठ्ठा राउंड मारून येऊया ."
अरे , कधी नव्हेतो स्वतःहून काहीतरी म्हणतोय . मी पटकन तयारी करायला उठले .
"हे काय ? नटण्या थटण्यात तास घालवशील .चल तशीच! तुला कोण बघणार आहे ?"
मी भडकलेच .
"अशा चुरगळलेल्या कपड्यांत बाहेर जायचं ? आणि कोणी बघणार म्हणून मी काही करीत नसते . मला आवडतं नीट नेटकं राहायला . थोडं ठीकठाक ,presentable व्हायला कोणी नटणं थटणं म्हणत नाही !"
"पाहिलंस , काहीतरी romantic ठरवावं तर तू भांडण उकरून काढतेस . सगळ्या आनंदावर विरजण घालतेस ."
"मी भांडण उकरून काढलं ?"
"नाहीतर काय ! अगं गाडीतून जायचंय . long drive घेऊ आणि चहाच्या वेळेपर्यंत परत येऊ !"
"ओह! गाडीने जायचंय ?मला वाटलं सायकलने टेकडीवर जायचं . मी किती दिवसांची तुला सांगतेय !"
"टेकडीवर पुन्हा कधीतरी जाऊया !"

मी मोठ्या प्रयत्नाने राग गिळला . रविवार नासवायचा नव्हता मला . तेव्हां वाजले होते दुपारचे तीन आणि चहाच्या वेळेला परत यायचं . निदान भटकणं आणि छानपैकी डिनर तरी ठरवायचं .

नकोय मला तुझी भीक . असे आनंदाचे चतकोर तुझ्या मर्जीने समोर फेकून ,त्यावर मी संतुष्ट व्हावं असं वाटतंय का तुला ? माझा आनंद मी मिळवेन ; एवढा दातृत्वाचा आव नकोय . थोडी चतुराई दाखवायला हवी .
"बरं ,चल जाऊया !" मी दोन पावलं टाकली आणि कळवळत बसकण मारली .
"आता काय झालं?"
"कंबरेत उसण भरली रे ! आई ग ! केवढी कळ गेली मस्तकात . आईग ssss!"मी विव्हळले .
"कर्म दरिद्री आहेस तू ! तुझ्यासाठी काही ठरवावं तर ते भोगायला पण नशीब लागतं ."

मला उठायला हात पण न देता ,तो तरातरा टेबलाकडे गेला . खचकन खुर्ची खेचून laptop उघडून बसला . मी टीव्हीच्या खोलीत जाऊन माझा stress buster विनोदी सिनेमा लावून बसले .

दिवस असेच चालले होते . हल्ली प्रियांका माझ्याकडे पूर्वी सारखी येत नव्हती . एका अत्यंत देखण्या , रुबाबदार मुलाला बिलगून बाईक वरून जाता येताना दिसत होती . मी दिसले तर हसून हात करायची .खूप आवडला मला तो मुलगा . प्रियांका सारख्या सर्वसामान्य , सर्वसाधारण पण प्रेमळ हसऱ्या मुलीचा जर तो boy friend असला तर खरोखरच गुणग्राहक म्हणायला हवा . दिसण्यापेक्षा असण्याला महत्व देणारा .प्रियांका मध्ये पण फरक पडत होता . कोमेजलेलं फुल पाणी शिंपडल्यावर टवटवीत दिसावं तशी ती तरारून आली होती . चेहऱ्यावर तृप्ती होती .डोळ्यांत चांदणं . बाईकवर त्याच्या मागे बसण्यात एक साम्राज्य जिंकल्याचा डौल !
. .असेच काही महिने गेले .निसर्गाचे ऋतू बदलले . माझ्या आयुष्यात एकच ऋतू होता ..ग्रीष्म !लग्न करून इकडे येताना मी माझी नोकरी सोडली होती .
"पैशात लोळते आहेस कशाला हवी आहे तुला नोकरी ?" असं म्हणून अरुणने मला पुन्हा नोकरी शोधण्यापासून परावृत्त केलं होतं .
"अरे मुली काय फक्त पैशासाठी नोकरी करतात कां? त्यांनाही आर्थिक स्वातंत्र्य हवं असतं !"
"काही लाखांची FD करतो तुझ्या नावावर !खुश? चल ,दिलं आर्थिक स्वातंत्र्य तुला!"
.
. दिलं ....? दिलं ....? आर्थिक स्वातंत्र्य काय , कोणतंही स्वातंत्र्य जहागिरी बहाल करण्यासारखं मला 'देणारा' हा कोण?
" मला माझी identity हवी ! चिमुटभर कां होईना :माझी स्वतःची identity !"

"चिमुटभर कशाला ..पसाभर घे !एका यशस्वी बिल्डरची एकुलती एक बायको , एवढी identity तुला पुरेशी नाहीये ?" जिवणी वाकडी करत तो छद्मीपणे हसला .
. . माझी मीच मला कळत नव्हते . बिअर प्यायली , केस कापले , आधुनिक कपडे घातले , पार्ट्यांत नवऱ्याबरोबर वाईनचा ग्लास हातात घेऊन मिरवलं म्हणजे स्वातंत्र्य झालं का ?विचारातलं..आचारातलं स्वातंत्र्य का मला दुसऱ्याकडे मागावं लागतंय ? म्हणजे मीच नवऱ्याला माझे स्वामित्व हक्क बहाल करतेय का ? गोंधळ होता सगळा .माझा आनंदाचा मार्ग मलाच शोधायला हवाय . पण चकवा लागला होता ; गरगर फिरत होते .

एका संध्याकाळी गेट समोर खूप वेळ सायकलची घंटा वाजत राहिली . प्रियांका .. नक्कीच प्रियांका.. ! मी लगबगीने गेट कडे धावले . प्रियांकाला boy friend मिळाल्यापासून तिचं माझ्याकडे येणं जवळपास बंदच झालं होतं .माझे पण वैचारिक गोंधळ चालले होते . नव्या ..वैवाहिक जीवनात मानाने , आत्मभान ठेवून रुजायचे प्रयत्न चालले होते . प्रियांकाच्या येण्या जाण्या कडे माझं लक्षच नसायचं . बाईकवरून पुन्हा सायकलवर ती कधी उतरली ? काय झालं असेल बरं ? ब्रेकप ? लगेच कसं विचारायचं तिला ?चेहरा तर सतेज ,मोहरलेला दिसत होता . मग नसेलही कदाचित ब्रेकप !

बोलता बोलता ती म्हणाली ,
"ताई , समोरच्या टेकडीवर कधी गेला आहात ? अभयारण्य आहे ते . अरण्यवाचन आवडतं तुम्हाला? जाऊया का एकदा ?"
"जाऊया का .. एकदा ? उद्याच जाऊया ! मला खूप भटकायचंय ग तिथे !"
"मी दाखवेन तुम्हांला. खूप वेळा जाते मी ."
"एकटी?"
"हो ! एकटी! आवडतं मला तिथे . प्रत्येक वेळेला कोण येणार आपल्या बरोबर ? समान आवड असणारे पण भेटले पाहिजेत ना? आणि सुरक्षित आहे ताई ! इतरही निसर्ग वेडी माणसं असतातच की तिथे ;आपण काही एकटे नसतो ."

आपल्या माणसांत असुनही एकाकी असणारी मी आणि परक्या अनोळखी माणसांतही सोबत मिळवणारी प्रियांका ! नक्की कोण स्वयंपूर्ण? कोण स्व-तंत्र ?

मी खुश झाले होते . किती दिवसांची माझी इच्छा पूर्ण होणार होती .
"सायकल वरून जाऊया !"
"चढ खूप आहे ताई . घाट रस्ता आहे . "
"चालेल ..चालेल ! झेपेल तितकं जाऊया !" मी उतावीळपणे म्हटलं .
"बरं मग .. उद्या सक्काळी लवकर निघूया !"

दुसऱ्या दिवशी खूप मजा आली . फ्लुरोसंट track suit घातलेली मी आणि नेहमीच्याच सलवार कमीज मधली कोवळी प्रियांका ! दमछाक खूप झाली पण आनंदच आनंद अवघं आसमंत व्यापून होता . मध्यान्ही एका घनदाट झाडाच्या सावलीत वनभोजन . खाद्यपदार्थांच्या टपऱ्या होत्या तिथे पण प्रियांका डबा घेऊन आली होती .रिकामे डबे आवरता आवरता म्हणाली ,
"ताई , मी आता दुसऱ्या गावाला जाणार . लग्न ठरलंय माझं ."
"Congratulations .. congratulations !" मी तिचा हात घट्ट पकडला . खरोखरच मला खूप आनंद झाला होता . " छान सुखी राहशील . सज्जन , सरळमार्गी वाटतो मुलगा, आणि देखणा पण किती आहे !"
. . ती गोंधळली होती .
"तुम्ही कधी पाहिलं त्यांना ?"
तिचा गालगुच्चा घेत मी म्हणाले , "मी पाह्यलंय तुम्हां दोघांना बाईकवरून जाताना ."
"ओह;...... ते?" हां हां म्हणता तिच्या चेहऱ्यावर मळभ दाटून आलं . डोळे पाणावले . अश्रूंना खंबीरपणे थोपवत खोटं हसत ती म्हणाली ,
"ते होय ? ताई बॉस आहेत ते माझे . मालक आहेत आमच्या कंपनीचे . चांगले आहेत खूप . त्यांचा आणि माझा रस्ता एकच असल्याने मला बाईकवर लिफ्ट द्यायचे ."
.
मी जे पहात होते , मला जाणवत होतं ते नुसतं लिफ्ट देणं नव्हतं .
.
"प्रियांका , काहीतरी लपवतेस माझ्यापासून ; सांगायचं नाहीये का?"
.
तिने गोळा केलेले रिकामे डबे खालमानेनेच पिशवीत भरले .
.

"प्रियांका फसवलंय कां त्याने तुला ? ही पैसेवाली पोरं असलीच . त्यांना फक्त मजा मारायला पोरी हव्यात .माज असतो ह्यांना ."
"नाही ,नाही ताई ;ते तसे नाहीत ."
"पोरींच्या बरोबर ऐश करायची , मजा मारायची आणि मग हात झटकून नामानिराळ राहायचं . मी चांगली ओळखून आहे अशा मतलबी पोरांना ! त्याने तुला लग्नाचं वचन दिलं होतं का? आता नाही म्हणतोय ?"
"लग्न? मीच त्यांच्याशी लग्न करणार नाही . ते कुठे आणि मी कुठे ?असा विजोड संसार मला निभावून नेता येणार नाही .त्यांचं जग वेगळ माझं वेगळ. तुम्हांला वाटतंय तसं नाहीये ." प्रियांका कळवळून म्हणाली . "त्यांना नका नावं ठेवू ." आता बांध तोडून तिच्या गालावरून अश्रू वाहायला लागले होते .
"ताई , माझ्या आईचा ,वहिनीचा , चाळीतल्या बायकांचे संसार पाहतेय मी . व्यसनी , बेजबाबदार नवरे . बायकोने कमवायचं . घर संसार चालवायचा . पोरंबाळ वाढवायची आणि नावार्याच्या व्यसनांना पैसे पुरवायचे . माझ्या सारख्या सामान्य मुलीला पण असाच सामान्य नवरा मिळणार . विड्र्या ओढणारा , हातभट्टी पिणारा . वेगळ काय घडणार आहे माझ्या बाबतीत ?"
.
"प्रियांका , त्याला माहिती आहे का तुझा हा निर्णय ? बोलली आहेस कधी त्याच्याशी ?"
.
ती गप्पच होती .
."बोल ग पोरी बोल ! तुझं आयुष्य बदलवून टाकायची ही एक संधी आहे . जास्तीत जास्त काय होईल?नाही म्हणेल . पण विचारलंच नाही असं नको ना व्हायला ?"
.
"आणि हो म्हणाले तर ?" ती विषण्णपणे म्हणाली . " ताई , प्रेम ही एक अशी भावना असते की ती सर्व विचारशक्तीचा ताबा घेते . लग्न होई पर्यंत आणि लग्न झाल्यावर पदोपदी येणारे अडथळे , व्यवहार , जातपात , सामाजिक दर्जा सगळं सगळं फार रुक्ष आणि क्रूर असतं .त्यात प्रेमाचा पालापाचोळा बनून जातो . लग्नामुळे दोन व्यक्तींचे नाही तर दोन कुटुंबांचेआणि त्यांच्या परिवाराचे संबंधजुळतात . मला त्यांच्या आयुष्याची बरबादी नाही करायची . मी तृप्त आहे मला जे मिळालंय त्यात ."
.

"अग , पण त्याचं काय ? तो मनाने गुंतलेला असला तर ? त्याला केवढा मोठा धक्का बसेल ! आयुष्यातून उठेल ग बिचारा !"

.

तिने ओठ घट्ट आवळून घेतले होते .स्वतःला आवरायची ती पराकाष्ठा करीत होती .प्रियांकाला त्याच्याशी लग्न नव्हतं करायचं ? मग? एवढा सहवास का? ... मी हतबुद्ध झाले होते .

.

"निघुया ताई ? नंतर मेन रोड वरची गर्दी वाढेल ."

.

आम्ही दोघींनी सायकली काढल्या .टेकडी उतरताना उतार खूप होता . सांभाळून सायकल चालवावी लागत होती . पायथ्याशी येऊन दोघीही थांबलो . काय बोलावं काही सुचत नव्हतं .प्रीयांकानेच कोंडी फोडली .

"ताई ,आता आपण पुन्हा नाही भेटणार . उद्यापासून मी कंपनीत नाही जाणार ."

.

पण ती निघाली नाही . थोडावेळ घुटमळली .मान किंचित वर उचलून शून्यात बघत म्हणाली ,

" ताई ,तुमच्या मनात काय आलंय कळतंय मला , असा देखणा , सुगंधी ,बळकट ,खानदानी पुरुष मला आयुष्यात कधी भेटेल कां? माझ्या शरीराच्या , मनाच्या उफाळणाऱ्या मागण्या मी कधी पूर्ण करायच्या? कित्तीतरी मुलींच्या ह्या इच्छा कायम अपूर्ण राहतात . माझं नशीब दांडगं म्हणून मला सर भेटले .त्या स्वर्गसुखाच्या आठवणींवर मी पुढचा सगळा संसार रेटेन !"

सुन्न होऊन मी सायकल वळवली .

"मला विसरू नकोस प्रियांका . माहेरी येशील तेव्हां भेटायला ये ."

ती अजून तशीच उभी होती . माझ्या डोक्यात विचारांचं प्रचंड वादळ चाललं होतं . मी प्रश्नार्थक नजरेने तिच्याकडे बघत स्तब्ध राहिले .

.

" ताई , एक विचारू ?..... "पहिल्या ....रात्री ...." तिने एक आवंढा गिळला ..." पहिल्या रात्री नवऱ्याला कळत काय हो :...... आधी संबंध आलेले ......?"

मी तिच्या नजरेत नजर मिसळली . तिचे डोळे कोरडेठाक होते ; उन्हाळ्यातल्या आटून गेलेल्या खोल वैराण विहिरीसारखे ! डोळे तर माझे पाझरत होते ! अविरत !